# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

दिनांक 12.01.2019 शनिवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 03 केसस 03 आरोपींना अटक करून, 4,050 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 13 केसस 22 आरोपींना अटक करून 39,350 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 78 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 1,103 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 4,50,900 वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. पाचपावली – जिवानीशी ठार मारणा–या आरोपींना तात्काळ ताब्यात घेतलेबाबत :**

गौरव उर्फ पांडया पिल्लेवान, वय 30 वर्षे, रा. लष्करीबाग, सर्कल नं. 15/21, नागपूर याचे ॲटोमध्ये प्रवासी भरण्याचे कारणावरून 15 दिवस अगोदर आरोपी क्र. 1) योगीराज धनविजय, वय अं. 35 वर्षे, रा. राणी दुर्गावती चौक, नागपूर, 2) विशाल विश्वकर्मा, वय अं. 38 वर्षे, रा. नवा नकाशा, नागपूर, 3) गोलू अंकुश मंडाले, वय 21 वर्षे, रा. लष्करीबाग, नागपूर व त्याचे इतर मित्र यांचेसोबत वाद झाला होता. दिनांक 11.01.2019 चे 2030 वा पुर्वी पो.स्टे. पाचपावली हद्यीत शनिचरा बाजार, जुने कॅरम क्लब मागे, नागपूर येथे आरोपीतांनी संगणमत करून गौरव उर्फ पांडया याला दगडाने डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिवानीशी ठार मारले. याप्रकरणी फिर्यादी मनीष बाबुराव पिल्लेवान, वय 33 वर्षे, रा. प्लॉट नं. 502, हरिदास नगर, लष्करीबाग, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. पाचपावली येथे मपोउपनि पी.पी अवचार, 7875389048 यांनी आरोपींविरूध्द कलम 302,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे. यातील सर्व आरोपी हे ताब्यात आहेत.

**3) पो.स्टे. सोनेगांव – गंभीर दुखापत करणा–या आरोपीस अटक :**

दिनांक 11.01.2019 चे 2215 वा चे सुमारास पो.स्टे. सोनेगांव हद्यीत प्लॉट नं. 54, पराते नगर, राजु सोनटक्के यांचे घरी, नागपूर येथे आरोपी हरिष अशोक बिरणवार, वय 20 वर्षे, रा. जुनी वस्ती सोनेगांव, नागपूर व अमीत देशमुख यांच्यात भांडण सुरू होते. फिर्यादी अनुप शेषराव इंगळे, वय 28 वर्षे, रा. जुनीवस्ती सोनेगांव, नागपूर हे भांडण सोडविण्याकरीता गेले असता आरोपीने आपल्या जवळील चाकूने फिर्यादीचे डावे मांडीचे वर कमरेच्या खाली मारून गंभीर जखमी केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सोनेगांव येथे पोउपनि पी.पी राठोड, 9767921291 यांनी आरोपीविरूध्द कलम 326 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे

**4) पो.स्टे. एम.आय.डी.सी – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 11.01.2019 चे 0900 वा चे सुमारास पो.स्टे. एम.आय.डी.सी हद्दीत राहणा–या फिर्यादीची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही बाहेर जावून येते असे सांगून गेली परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. एमआयडीसी येथे पोउपनि मदनकर, 9881308011 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**5) पो.स्टे. अजनी, गणेशपेठ – शासकीय कामात अडथळा निर्माण करणा–या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल :**

1) अजनी – फिर्यादी शिशपाल रामफलसिंह शोकल, वय 24 वर्ष, रा. शिवकृपावंदन अपार्टमेंट, काटोल रोड, नागपूर हे भारत सरकारचे सांखिकी नियम एव कार्यान्वय मंत्रालय राष्ट्रीय प्रतीदश सर्वेक्षण कार्यालय क्षेत्र विभाग क्षेत्रिय कार्यालय सि.जी.ओ. कॉम्प्लेक्स ब्लॉक नं. ए, तिसरा माळा सेमीनरी हिल्स, नागपूर येथे कनिष्ठ सांखिकी अधिकारी या पदावर असून सरकारच्या कार्यक्रमानुसार सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण प्रत्यक्ष घरोघरी जावून विहीत फार्म नुसार माहीती संकलीत करण्याचे शासकीय काम करीत असतांना दिनांक 11.01.2019 चे 1520 वा चे सुमारास पो. स्टे. अजनी हद्दीत प्लॉट नं. 20, न्यु ज्ञानेश्वर नगर, नागपूर येथे राहणारा आरोपी क्र. 1) अजय सुरेशप्रसाद कमकर, वय 36 वर्ष, व आरोपी क्र. 2) राहुल सुभाष प्रसाद, वय 36 वर्ष, रा. प्लॉट नं. 23, न्यु कैलाश नगर, नागपूर यांना फिर्यादीने व त्यांचे सहकारी श्री प्रविण पाल, वय 36 वर्ष, यांनी आरोपींना ओळखपत्र दाखवून कामाचे कारण सांगीतल्या नंतर आरोपींनी संगणमत करून खर्रा घोटण्याच्या पाटीने मारहान केली. घरात बांधून ठेवण्याचा प्रयत्न करून सोडण्यासाठी 5 ते 7 हजार रूपयाची मागणी करून अटकावुन ठेवले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. अजनी येथे मपोउपनि भुते, 9822566180 यांनी आरोपींविरूध्द कलम 353,342,186,332,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपींना अटक केली आहे.

2) गणेशपेठ – दिनांक 11.01.2019 चे 2030 वा चे सुमारास फिर्यादी पोउपनि किशोर दत्तात्रय पवार, नेमणुक पो.स्टे.गणेशपेठ, नागपूर शहर हे आपल्या स्टॉपसह भालदारपुरा भागात आमरोडवर व फुटपाथवर अडथळे निर्माण करणारे व्यक्तीवर चालान कार्यवाही करीत असतांना पो.स्टे. गणेशपेठ हद्दीत हिंद फर्निचर नातीक चौक येथे आरोपी क्र. 1) शेख दाउत शेख मेहबुब, वय 45 वर्ष, 2) याकुब शेख मेहबुब शेख, वय 44 वर्ष, दोन्ही रा. भालदारपुरा, नागपूर यांनी संगणमत करून फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करून धमकी दिली. फिर्यादीचे शर्टची कॉलर पकडून धक्काबुक्की केली व सहका–यांना मारहान करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे पोउपनि एस.पी इंगळे, 7588523831 यांनी आरोपींविरूध्द कलम 353,352,341,294,506,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पो.स्टे. गणेशपेठ :**

1) गणेशपेठ – दिनांक 11.01.2019 चे 0900 वा पुर्वी सुरेश आनंद कोढे, वय 71 वर्ष, रा. गाडीखाना महाल, नागपूर हे पो.स्टे. गणेशपेठ हद्दीत गाडीखाना, भुविकास बॅकमागे, ओटयावर मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी अनुप वसंतराव चांदघोडे, वय 30 वर्ष, रा. झेंडा चौक, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे मपोउपनि यु.एन.मडावी, 8525067457 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) गणेशपेठ – दिनांक 11.01.2019 चे 1400 वा चे सुमारास अंदाजे 30 ते 35 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. गणेशपेठ हद्दीत संत्रा मार्केट, नागपूर येथे मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी भगवानदास तुळशीदास प्रजापती, वय 42 वर्ष, रा. कुंभारपुरा, संत्रा मार्केट, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे पोउपनि आर.झेड. नन्नावरे, 9623140100 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

# प्रेसनोट

## ➢ Decoy ऑपरेशन व फेरिवाल्याविरूध्द विशेष मोहिम

पोलीस आयुक्त, नागपूर शहर डॉ. भूषणकुमार उपाध्याय व पोलीस उप–आयुक्त, वाहतूक राज तिलक रौशन यांचे मार्गदर्शनाखाली वाहतुक नियंत्रण विभागातर्फे दि. 10.01.2019 व दि. 11.01.2019 रोजी पासुन सतत लाल दिव्यांचे उल्लंघन (**Signal Jumping** ) व विरूध्द दिशेने ( **Wrong Side** ) ने येणारे वाहन चालकांविंरूध्द **Decoy** ऑपरेशन व फेरिवाल्याविरूध्द विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये प्रमाख्याने वाडी टि–पाईन्ट, 13 नंबर नाका,गणेशपेठ बसस्थानक,शितला माता मंदिर चौक,उदयनगर चौक,बजाजनगर चौक,कोकाकोला चौक,पोलीस तलाव टि–पाईन्ट, निर्मला गर्ल्स हॉस्टेल, कन्नमवार चौक,टेलिफोन एक्सचेन्ज चौक या चौकामध्ये वाहतुक पोलीस न नेमता चौकापासुन पुढे 100 ते 200 मिटर अंतरावर साध्या वेशातील पोलीस नेमुण लाल दिव्यांचे उल्लंघन (**Signal Jumping** ) व विरुध्द दिशेने ( **Wrong Side** ) ने येणारे वाहन चालकांविंरूध्द **Decoy** ऑपरेशन राबवुन कार्यवाही करण्यात आली.

तसेच रहदारीचे रस्त्यावर फेरिवाले/हातठेले वाले आपला हातठेला लावुन सामानाची विक्री करतात. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होवुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन अश्या प्रवृत्तीस आळा बसण्याकरीता रस्त्यावर जाणा–या वाहनांना अडथळा निर्माण करणा–या फेरिवाल्याविरूध्द कलम 102/177 मपोका अन्वये कार्यवाही करण्यात आली, ती खालीलप्रमाणे सादर आहे.

| अ. क्र. | वाहतुक परिमंडळ | फेरीवाले यांचे विरूध्द कलम 102/177 मपोका अन्वये करण्यात आलेली कार्यवाही | Decoy ऑपरेशन कार्यवाही | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| 1 | MIDC झोन | — | 36 | **36** |
| 2 | सोनेगाव झोन | 14 | 11 | **25** |
| 3 | सिताबर्डी झोन | 11 | 29 | **40** |
| 4 | सदर झोन | 30 | 26 | **56** |
| 5 | कॉटन मार्केट झोन | 17 | 47 | **64** |
| 6 | लकडगंज झोन | 11 | 43 | **54** |
| 7 | अजनी झोन | 45 | 36 | **81** |
| 8 | इंदोरा झोन | 20 | 22 | **42** |
| **एकुण** | | **148** | **250** | **398** |

तरी यापुढे सतत कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याने, वाहन धारकानी तसेच फेरीवाल्यानी याची नोंद घेवुन आपले विरूद्ध होणारी कारवाई टाळण्याकरीता वाहतुक नियमांचे पालन करावे आणि स्वतःला सुरक्षित ठेवावे व पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर